नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २३/०९/२०२६ (बुधवार)

.....................................................................................

## गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर रामटेक येथे मा. वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या प्रमुख उपस्थितीत रूट मार्च; विसर्जनस्थळाच्या सुरक्षा व्यवस्थेची पाहणी

पोलीस स्टेशन रामटेक :— गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणेश विसर्जन मिरवणुका शांततेत, सुरक्षित व सुरळीत पार पडाव्यात यासाठी नागपूर ग्रामीण पोलीसांकडून विविध उपाययोजना करण्यात येत असून, त्याअनुषंगाने आज दिनांक २३/०९/२०२६ रोजी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांनी रामटेक येथे प्रत्यक्ष भेट देऊन सुरक्षा व्यवस्थेची पाहणी केली.

यावेळी मा. वरिष्ठ पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार यांच्या प्रमुख उपस्थितीत रामटेक शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च घेण्यात आला. रूटमार्चच्या माध्यमातून पोलीस अधिकारी व अंमलदारांनी शहरातील प्रमुख मार्गांवर संचलन करून नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासोबतच आगामी गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर पोलीस दलाची सज्जता प्रदर्शित केली.

त्यानंतर मा. वरिष्ठ पोलीस अधीक्षक यांनी रामटेक येथील अठराभुजा गणपती मंदिरास तसेच लालबहादुर शास्त्री गणेश मंडळास भेट देऊन तेथील सुरक्षा व्यवस्था, भाविकांची संभाव्य गर्दी, वाहतूक व्यवस्था तसेच गणेशोत्सवाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पोलीस बंदोबस्ताची पाहणी केली. तसेच राखी तलाव, रामटेक येथे भेट देऊन गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेल्या सुरक्षा व्यवस्थेची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. राखी तलाव परिसरात भाविकांच्या सुविधेसाठी व गणेशमूर्तींच्या विसर्जनासाठी उभारण्यात आलेल्या कृत्रिम विसर्जन तलावांचीही पाहणी करण्यात आली. विसर्जनाच्या वेळी

होणारी भाविकांची गर्दी, वाहनांची ये—जा, मिरवणुकीचा मार्ग, विसर्जनस्थळी आवश्यक असलेली सुरक्षा व्यवस्था तसेच आपत्कालीन परिस्थितीत करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत संबंधित अधिकारी यांच्याकडून माहिती घेण्यात आली.

मा. वरिष्ठ पोलीस अधीक्षक यांनी विसर्जन प्रक्रिया शांततेत, शिस्तबद्ध आणि सुरक्षित पद्धतीने पार पडण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना काटेकोरपणे राबविण्याच्या सूचना संबंधित पोलीस अधिकारी व इतर विभागाच्या अधिकारी यांना दिल्या. नागरिकांची सुरक्षितता, वाहतूक सुरळीत राहणे तसेच कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी पोलीस यंत्रणेने सतर्क राहण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या.

सदर पाहणीदरम्यान श्री. प्रियेश महाजन, उपविभागीय दंडाधिकारी, रामटेक, श्री. रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग,  श्रीमती पल्लवी राऊत, मुख्याधिकारी, नगरपरिषद रामटेक,  श्री. रमेश कोळपे, तहसीलदार, रामटेक, श्री. राजेश कुमार थोरात, पोलीस निरीक्षक, रामटेक पोलीस स्टेशन  उपस्थित होते.




HONDA










## डिझेल चा अवैधरित्या साठा करून ठेवणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## ५ लाख ४९ हजार ७०० रूपयांचा मुद्देमाल जप्त
## नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन बोरी :— मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री अंकुश माने , प्रभारी अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने डिझेल चा अवैधरित्या साठा करून ठेवणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद करीत एकुण ५,४९,७००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

दिनांक २२/०९/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला पेट्रोलींग दरम्यान गुप्तबातमीदार कडुन खात्रीशीर खबर मिळाली की, रुईखैरी शिवारात राष्ट्रीय महामार्ग क्र ४४ वरील वर्धा वाय—पॉइंट पुलाजवळ बंद इमारतीच्या मागे काही संशयित व्यक्ती वाहनासह थांबुन असुन त्यांच्या हालचाली संशयास्पद आहे. नमुद माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने बोरी पोलीस आणि अंमली पदार्थ विरोधी पथक यांच्या मदतीने कारवाई करत रुईखैरी शिवारात एन एच —४४ वरील वर्धा वाय—पॉइंट पुलाजवळ बंद इमारतीच्या मागे धाड टाकली असता पोलिसांची चाहूल लागताच संशयित आरोपी त्यांचे वाहने जागीच सोडून जवळच

असलेल्या झाडीझुडपात अंधाराचा फायदा घेत पळून गेले. पोलीसांनी घटनास्थळावरील वाहनाची पाहणी केली असता टाटा इंट्रा एम एच ३७ टी २२०३ या वाहनामध्ये १५ प्लास्टिक कॅनमध्ये ३०० लिटर डिझेल अवैधरित्या साठवणुक केलेले मिळुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष १) १५ प्लास्टिक कॅनमध्ये ३०० लिटर डिझेल २९,४००/— रूपये किंमतीचे २) टाटा इंट्रा एम एच ३७ टी २२०३ किंमती ४,००,०००/— रूपये, ३) विना क्रमांकाची होन्डा ॲक्टीव्हा दुचाकी किंमती ७०,०००/— रूपये, ४) विना क्रमांकाची टीव्हीएस ज्युपिटर दुचाकी किंमती ५०,०००/— रूपये , ५) ३ रिकाम्या कॅन, १० फूट प्लास्टिक पाईप, चाळणी इत्यादी सहीत्या असा एकुण ५,४९,७००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. सदर प्रकरणी तिन्ही वाहन चालक आरोपींवर कलम ३, ७ अत्यावश्यक वस्तू कायदा सहकलम ८ (१) पेट्रोलियम अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

## अस्तित्व लपवुन गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या आरोपीतांविरूध्द ०२ गुन्हे नोंद

दिनांक २२/०९/२०२६ रोजी स्वत:चे अस्तित्व लपवुन सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयाच्या पुर्वी संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या इसमांविरूद्ध नागपूर ग्रामीण पोलीसांनी खालील प्रमाणे कारवाई केली.

**पोलीस स्टेशन उमरेड** अंतर्गत आरोपी नामे **निलेश निरंजन चंदेल, वय १८ वर्ष, रा. ईतवारीपेठ ता उमरेड** हा मौजा उदासा, ता. उमरेड येथे तसेच **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** अंतर्गत आरोपी नामे **१) जितेंद्र शामराव लाजेवार, रा. ह. मु वैशाली नगर, वार्ड क्र. ०५ टाकळघाट २) पवन माणिक शेलोट, रा. ह.मु वैशाली नगर वार्ड क्र ०५, ता. हिंगणा, जि. नागपुर हे सनविजय कंपनी जवळ** हे स्वत:चे अस्तित्व लपवुन सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयाच्या पुर्वी संशयास्पदरीत्या फिरतांना मिळुन आले. सदर इसमांना त्यांचे नाव व गाव विचारले असता त्यांनी उडवा उडवीचे उत्तरे दिली. नमुद आरोपी हे गुन्हा करण्याचे उद्देशाने वावरतांना मिळुन आल्याने आरोपीतांचे विरूद्ध कलम १२२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

## अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर २२ गुन्हे दाखल

**दिनांक २२/०९/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक, वाहतूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकुण २२ गुन्हे दाखल केले.**

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन केळवद** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** अंतर्गत ०७ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन खापा अंतर्गत** ०२ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत** ०२ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन देवलापार अंतर्गत** ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन मौदा अंतर्गत** ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत** ०६ गुन्हे नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ७२०० मिली देशी दारू, ६९ लिटर मोहाफुल दारू असा एकुण १०,१००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## अवैध जुगार खेळणाऱ्या ०२ आरोपींवर गुन्हे दाखल

**नागपूर ग्रामीण जिल्ह्यात अवैधरित्या जुगार खेळणाऱ्या तसेच जुगार खेळविणाऱ्या व्यक्तींविरुद्ध पोलीस स्टेशन पाचगाव आणि काटोल हद्दीत अवैधरित्या जुगार खेळणाऱ्या आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकूण ०२ गुन्हे दाखल करण्यात आले.**

**पोलीस स्टेशन पाचगाव** येथे आरोपी नामे गंगाराम बिदेशी भालेराव, वय ६८ वर्ष, रा. वार्ड क्र. ०१ पाचगाव, ता. उमरेड जि. नागपूर हा अवैधरित्या सट्टापट्टीचा जुगार चालवितांना मिळुन आल्याने त्याचे वर **०१ गुन्हा नोंद** करण्यात आला आहे. **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे वामन विठठलराव बेलखेडे, वय ५६ वर्षे, रा.लाडगाव, ता. काटोल, जि. नागपुर हा अवैधरित्या सट्टापट्टीचा जुगार चालवितांना मिळुन आल्याने त्याचेवर **०१ गुन्हा नोंद** करण्यात आला आहे.

**वर प्रमाणे ०२ आरोपीविरूध्द महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०२ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. सट्टापट्टी साहित्य, नगदी एकुण ७९५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर